संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## ई-निविदा सूचना

क्र.संगाबाअवि/१/१३७/ ४-५९० /२०२५.　　　　　　　　　　　　दिनांक : २२/०९/२०२५

खालील कामाची ई-निविदा पंजीबद्ध नोंदणीकृत कंत्राटदार/सेवापुरवठादार निविदाधारकांकडून मागविण्यात येत आहे. सविस्तर निविदा www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर माहितीकरिता व महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर निविदा भरता येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा आवेदनपत्राची किंमत रुपये | निविदा इसार रक्कम रुपये (EMD) | निविदा सादर करण्याची अंतिम तिथी दुपारी १.०० वा. पर्यंत | निविदा उघड करण्याची तिथी दुपारी १.००वा. |
|---|---|---|---|---|---|
| १. | संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील विविध विभागांमध्ये बाह्य यंत्रणे (Out sourcing) द्वारा कंत्राटी पद्धतीने खालील प्रमाणे पदनिहाय अर्हताधारक ५० अधिक वेळोवेळी गरजे प्रमाणे वाढीव मनुष्यबळ पुरविण्याबाबत द्विवार्षिक कंत्राट<br>अ.क्र. पद<br>१. कार्यालयीन सहाय्यक<br>२. लघुलेखक<br>३. प्रयोगशाळा सहाय्यक<br>४. अभियंता (स्थापत्य)<br>५. अभियंता (विद्युत)<br>६. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक<br>७. विद्युत पर्यवेक्षक<br>८. सबस्टेशन ऑपरेटर<br>९. नेटवर्क टेक्निशियन<br>१०. डाटा एन्ट्री ऑपरेटर<br>११. वेबसाइट डेव्हलपर<br>१२. तांत्रिक सहाय्यक<br>१३. कृषि सहाय्यक<br>१४. माळी (Gardener)<br>१५. बहुउद्देशिय अर्धकुशल कर्मचारी | २३६००/- (with GST) | २०००००/- | | |

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

***अटी व शर्ती -***

१. उपरोक्त निविदा पंजीबद्ध/नोंदणीकृत कंत्राटदार/सेवा पुरवठादारांकडून मागविण्यात येत आहे.
२. सदर निविदा दि. २३/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येत असून ई निविदा द्वारे सदर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख १४/१०/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता आहे. सादर झालेल्या निविदा उघडण्याची तारीख शक्यतोवर दि. १६/१०/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता आहे. सदर निविदा ई-निविदा कक्ष, अभियांत्रिकी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे उघडण्यात येईल.

३. कंत्राटदार/सेवापुरवठाधारकाने **किमान वेतन कायद्यानुसार पुरविण्यात येणाऱ्या पदनिहाय मनुष्यबळाचा मासिक** (दर) रकमेची निविदा सादर करावी. तसेच निविदेत नमूद केलेल्या मासिक वेतनात सर्व्हीस चार्जेस ( सेवा शुल्क) बाबत जर एजन्सीने/निविदाधारकांनी **शुन्य/निरंक, अथवा अव्यवहार्य टक्केवारी** नमूद केली तर अशी निविदा **अप्रतिक्रियाशील/भावशुन्य (Unresponsive)** ठरविण्यात येवून विचारात घेतली जाणार नाही.

४. निविदाधारकांनी ई-निविदेसोबत खालील दस्तऐवजांसह दरपत्रक जोडणे आवश्यक आहे.
१. अनामत रक्कम भरण्यापासून सुट असल्याचे सक्षम प्राधिकरण यांचे प्रमाणपत्र. २. शासकीय/खासगी,व्यक्ती संस्था नोंदणी प्रमाणपत्र. ३. आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र. ४. अद्ययावत आयकर निर्धारण प्रमाणपत्र (मागील तीन वर्षांचे) ५. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र. ६ पॅन कार्ड. ७. कोणत्याही इतर संस्थेने काळ्या यादीत न टाकल्याचे हमीपत्र (Annexure -A ) ८. फॉल क्लॉज प्रमाणपत्र (Annexure -B ) ९. ( Turnover Certificate last three years.

५. सहा.कुलसचिव (प्रशा.) यांचे कार्यालयामध्ये नोटीस बोर्डावर सविस्तर निविदा सूचना पाहावयास मिळेल.

६. कोणतेही कारण न सांगता/ न देता सदहू निविदा अंशतः किंवा पूर्णतः स्वीकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेले आहेत.

७. निविदा आवेदनपत्र व अनामत रक्कम http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन भरावी लागेल.

८. निविदा संबंधित भरावयाची रक्कम जसे सुरक्षा ठेव इ. वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नावे असलेल्या धनाकर्ष (Demand Draft),धनादेश(Cheque) द्वारे विद्यापीठाच्या वित्त विभागात भरण्यात यावी व त्याची पावती प्रशासन विभागास सादर करावी.

९. बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था/लोकसेवा केंद्र हे सदर कामाच्या निविदा ई-निविदाद्वारे भरण्याची कार्यवाही करू शकतात. सदर संस्थांना अनामत रक्कम भरण्यापासून सुट असून त्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१०. ज्या निविदाधारकाची निविदा स्विकृत करण्यात येईल, त्याच निविदाधारकास पतदारी प्रमाणपत्र (Solvency Certificate) सादर करावे लागेल.

११. लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रांची प्रत मोहोरबंद लिफाफ्यामध्ये सहाय्यक कुलसचिव(सा.प्र.) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे कार्यालयात निविदा उघडण्याच्या अंतिम तिथीपूर्वी एक दिवस अगोदर कार्यालीन कामकाजाचे दिवशी व कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत सादर करावी लागेल. लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रे अपूर्ण असल्यास निविदा स्विकृत होणार नाहीत.

१२. निविदाधारकास/कंत्राटदारास यासंबंधीचे निदेश/विनियमाचे पालन करणे बंधनकारक राहील.

स्वा/-
सहा.कुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*प्रतिलिपी माहितीस्तव-*

१. वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२. प्रमुख, संगणक केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना निविदा सुचना वेबसाईटवर प्रसिद्ध करण्याकरिता.
३. उपकुलसचिव (लेखा), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
४. सहा.कुलसचिव (अंकेक्षण), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*प्रत माहिती व प्रसिद्धी देण्यास्तव-*

५. उपसंचालक, रोजगार व स्वयंरोजगार विभागीय मुख्यालय, गांधी चौक, अमरावती
६. सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, दत्त पॅलेस, गांधी चौक, अमरावती यांना विनंती की, उपरोक्त निविदा सुचना बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था व लोकसेवा केंद्र यांना वितरीत करावी.
७. नोटीस बोर्ड